# प्रकरण – २

## रुग्णालयाची रचना, कार्य व कर्तव्य यांचा तपशील

**२.१ रुग्णालयाचे उद्दिष्ट:**

जनतेला उत्तम आरोग्य सेवा उपलब्ध करुन त्यांच्या आरोग्याची काळजी घेण्यासाठी तसेच त्यांना आरोग्य विषयक बाबी करण्यासाठी प्रोत्साहित करण्यासाठी व बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून उपलब्ध होणारा निधी नागरिकांच्या हिताकरीता खर्च करण्यासाठी.

**२.२ कार्य – जनहितासाठी करण्याबाबतची उपाययोजना:**

समाजाच्या आरोग्याची काळजी घेऊन त्यात वृध्दी करण्यासाठी विविध सेवा उपलब्ध करुन नागरिकांचे आरोग्यमान वाढविणे व त्यासाठी उपलब्ध होणा-या पालिकेच्या निधीतून आरोग्यविषयक बाबींचे आधुनिकीकरण करणे.

**२.३ थोडक्यात इतिहास व कार्यपध्दतीची माहिती:**

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या शताब्दी प्रित्यर्थ कांदिवली (प) व गोवंडी येथे महानगरपालिकेतर्फे रुग्णालय सुरू करण्याचा प्रकल्प राबविण्यात आला. दोन्ही रुग्णालयांचे नामकरण शताब्दी रुग्णालय करण्यात आले. कांदिवली (पश्चिम) येथील शताब्दी रुग्णालयाचे उद्घाटन तत्कालीन महापालिका आयुक्त सन्माननीय श्री. सुकथणकर यांचे हस्ते दि.२३/०३/१९८३ रोजी करण्यात आले. माहे जुन १९८४ पासून १०० खाटांची क्षमता असलेले आंतररुग्ण सेवेसह सर्वसाधारण रुग्णालय सुरू करण्यात आले.

- १९९० साली बजाज महापालिका शाळेत कार्यरत असलेले २० खाटांचे प्रसुतीगृह शताब्दी रुग्णालयात समाविष्ट करण्यात आले.
- दिनांक १ फेब्रुवारी २००० पासून रुग्णालयाच्या इमारतीच्या मोठ्या प्रमाणाच्या दुरुस्तीसाठी सदर रुग्णालयाचे काही विभाग बोरवली (पश्चिम) येथील कस्तुरबा रोड प्रसुतिगृह आणि गोरेगांव (पश्चिम) येथील सिध्दार्थ रुग्णालयामध्ये स्थानांतरीत करण्यात आले.

- मोठ्या दुरुस्तीऐवजी रुग्णालयाचा पुनर्विकास करण्याचा धोरणात्मक निर्णय घेण्यात आल्यानंतर सदर रुग्णालयाच्या पुनर्विकास प्रकल्पाचे बांधकाम दिनांक ०१.१०.२००६ पासून सुरू करण्यात आले.
- पुनर्विकसित रुग्णालयाचे नामकरण भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर महानगरपालिका सर्वसाधारण रुग्णालय असे करण्यात आले.
- दिनांक १७.१२.२०११ पासून बाह्यरुग्ण विभाग व १०.०६.२०१३ पासून एम.आर.आय. सुविधा सुरू करण्यात आली.
- ३२३ खाटांचे पुनर्विकसित रुग्णालय दिनांक ०२.०९.२०१३ पासून सुरू करण्यात आले.
- बोरिवली (पश्चिम) येथील श्री. हरिलाल भगवती मनपा सर्वसाधारण रुग्णालयाची मुख्य इमारत धोकादायक घोषित झाल्यामुळे ते रुग्णालय बंद करुन तेथील सर्व विभाग व सेवा सुविधा कांदिवली (पश्चिम) येथील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर रुग्णालयात स्थानांतरित करण्यात आल्या.

**२.४ सद्यस्थिती:**

आर/दक्षिण विभागातील कांदिवली (पश्चिम) येथील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर महानगरपालिका सर्वसाधारण रुग्णालय मुंबईच्या पश्चिम उपनगरांतील उत्तरेकडील सर्वात मोठे रुग्णालय आहे. ह्या रुग्णालयाची सद्यस्थितीत क्षमता ४४४ रुग्णशय्यांची आहे.

**बाह्य व आंतररुग्ण सेवा:** वैद्यकीय चिकित्सा, मनोविकार चिकित्सा, अग्नीदाह (बर्न), केमोथेरपी, डॉट्स (टी.बी.), शल्यकर्म चिकित्सा, स्त्रीरोग व प्रसूतीशास्त्र चिकित्सा, अस्थिव्यंग्य चिकित्सा, कान-नाक-घसा चिकित्सा, नेत्ररोग चिकित्सा, बालरोग चिकित्सा

**केवळ बाह्यरुग्ण:** त्वचारोग, दंतचिकित्सा विभाग

**अत्यावश्यक सेवा:** २४ तास अपघात विभाग, शस्त्रक्रिया विभाग, १४ रुग्णशय्यांचे वैद्यकिय अतिदक्षता विभाग व १६ रुग्णशय्यांचे सर्जिकल अतिदक्षता विभाग, १० रुग्णशय्यांचे नवजात अर्भक अतिदक्षता विभाग, बर्न विभाग, डायलेसिस सेवा

**निदान सुविधाः** २४ तास क्ष-किरण तपासणी, २४ तास रक्त तपासणी, २४ तास सोनोग्राफी, २४ तास सीटी स्कॅन, दोन पाळ्यांमध्ये एमआरआय, जीन एक्स्पर्ट निदान सुविधा

**इतर सहाय्यकारी सेवा सुविधाः** रुग्णवाहिका, शववाहिनी, शवागृह, रक्तपेढी, दिलास केंद्र, शक्ती क्लिनिक, ए.आर.टी. सेंटर (एकात्मिक समुपदेशन व रक्तचाचणी), आय.सी.टी.सी. सेंटर, भौतिकोपचार विभाग, आहारतज्ज्ञ, प्राथमिक आरोग्य केंद्र, स्कुल क्लिनिक, वरिष्ठ नागरिकांना सुविधा, लसीकरण

**महिलांसाठी सेवा सुविधाः**

कार्यस्थळी लैंगिक अत्याचार प्रतिबंधक समिती, वन स्टॉप हेल्प सेंटर, दिलासा केंद्र, जननी शिशु सुरक्षा कार्यक्रम (जेएसएसके), जननी सुरक्षा योजना (जेएसवाय), माता मृत्यु आढावा / गुणवत्ता समिती, एम मित्रा, कुटुंब नियोजनाच्या सुविधा, प्रधानमंत्री सुरक्षित मातृत्व अभियान

## २.५ सेवा सुविधांची उपलब्धताः

| नियमित बाह्यरुग्ण सेवा | दिवस | वेळ |
|---|---|---|
| वैद्यकीय चिकित्सा ओपीडी | सोमवार ते शनिवार | सकाळी ८.०० ते ११.०० |
| सर्जिकल ओपीडी | सोमवार, बुधवार व शुक्रवार | सकाळी ८.०० ते ११.०० |
| बालरोग चिकित्सा ओपीडी व लसीकरण | सोमवार ते शनिवार | सकाळी ८.०० ते ११.०० |
| स्त्रीरोग ओपीडी | सोमवार ते शनिवार | सकाळी ८.०० ते ११.०० |
| प्रसुतीपुर्व (एएनसी) ओपीडी | सोमवार ते गुरुवार | दुपारी १२.३० ते १.३० |
| अस्थिव्यंग्य ओपीडी | सोमवार ते शनिवार | सकाळी ८.०० ते ११.०० |
| दंतचिकित्सा ओपीडी | सोमवार ते शनिवार | सकाळी ८.०० ते ११.०० |
| कान-नाक-घसा ओपीडी | मंगळवार, गुरुवार, शनिवार | सकाळी ८.०० ते ११.०० |
| नेत्ररोग चिकित्सा ओपीडी | सोमवार, बुधवार, शुक्रवार | सकाळी ८.०० ते ११.०० |
| डॉट्स प्लस (टी.बी.) | सोमवार ते शनिवार | सकाळी ८.०० ते ११.०० |
| अपघात विभाग (कॅज्युअल्टी) | सर्व दिवस | २४ तास |

| **ई.एन.टी. विभाग - विशेष क्लिनिक** | दिवस | वेळ |
|---|---|---|
| ऑडियोमेट्री क्लिनिक | मंगळवार, गुरुवार शनिवार | सकाळी ९.०० ते १२.०० |
| ओटोऍक्युस्टिक एमिशन क्लिनिक | मंगळवार व गुरुवार | दुपारी १.०० ते ३.०० |

| | | |
|---|---|---|
| बेरा (एबीईआर) व ऑडिटरी स्टेडी स्टेट रिस्पाँस (एएसएसआर) क्लिनिक | मंगळवार व गुरुवार | दुपारी १.०० ते ३.०० |
| स्पीच थेरपी क्लिनिक | मंगळवार, गुरुवार शनिवार | सकाळी ९.०० ते १२.०० |

| **स्त्रीरोग व प्रसूतीशास्त्र विभाग – विशेष क्लिनिक** | दिवस | वेळ |
|---|---|---|
| प्रसूती पूर्व क्लिनिक (ANC Clinic) | सोमवार ते शनिवार | सकाळी ११ ते दुपारी २ |
| प्रसूती पश्चात क्लिनिक (PNC Clinic) | सोमवार ते शनिवार | सकाळी ११ ते दुपारी १२ |
| गायनॅक – ऑन्कॉलॉजी क्लिनिक | गुरुवार, शुक्रवार, शनिवार | सकाळी १० ते ११ |
| जोखमीच्या प्रसूती क्लिनिक (High Risk Pregnancy Clinic) | सोमवार, मंगळवार, बुधवार | दुपारी १ ते २ |
| गर्भ – वैद्यकीय चिकित्सा क्लिनिक (Fetal Medicine Clinic) | गुरुवार, शुक्रवार, शनिवार | दुपारी १२ ते १ |
| आयव्हीएफ / एआरटी क्लिनिक | गुरुवार, शुक्रवार, शनिवार | सकाळी ९ ते १० |
| कुटुंब नियोजन क्लिनिक | सोमवार ते शनिवार | सकाळी ८.३० ते १०.३० |

| **बालरोग चिकित्साशास्त्र विभाग – विशेष क्लिनिक** | दिवस | वेळ |
|---|---|---|
| सुदृढ बालक क्लिनिक | सोमवार ते शनिवार | दुपारी १२ ते १ |
| बाल अस्थमा क्लिनिक | प्रत्येक मंगळवारी | दुपारी १२ ते १ |
| बाल मेंदुविकार क्लिनिक | प्रत्येक बुधवारी | दुपारी १२ ते १ |
| नवजात अर्भक क्लिनिक | प्रत्येक शुक्रवारी | दुपारी १२ ते १ |
| कुपोषण पुनर्वसन केंद्र | प्रत्येक गुरुवारी | दुपारी १२ ते १ |

| **सहाय्यकारी सेवा** | दिवस | वेळ |
|---|---|---|
| औषधालय (फार्मसी) | सर्व दिवस | सकाळी ८.०० ते संध्याकाळी ८.०० |
| रुग्णवाहिका व शववाहिनी | सर्व दिवस | २४ तास |
| शवागृह (मॉर्च्युरी) | सर्व दिवस | २४ तास |


| **चाचण्या (डायग्नॉस्टिक फॅसिलीटी)** | दिवस | वेळ |
|---|---|---|
| प्रयोगशाळा (लॅब) | सर्व दिवस | २४ तास |
| ई.सी.जी. | सर्व दिवस | २४ तास |
| क्ष-किरण (एक्स-रे) | सर्व दिवस | २४ तास |
| सोनोग्राफी | सर्व दिवस | २४ तास |
| सिटी स्कॅन | सर्व दिवस | २४ तास |
| एमआरआय | सोमवार ते शनीवार | सकाळी ९.०० ते संध्याकाळी ४.०० |

| **अतिदक्षता विभाग** | दिवस | वेळ |
|---|---|---|
| मेडिकल आय.सी.यू. | सर्व दिवस | २४ तास |
| सर्जिकल आय.सी.यू. | सर्व दिवस | २४ तास |

| **या रुग्णालयामध्ये खालील चाचण्या २४ x ७ विनाशुल्क केल्या जातात.** | | |
|---|---|---|
| १. ब्लड शुगर | ८. डायरेक्ट बिलरुबीन | १५. एचबीएसएजी |
| २. सेरम क्रिएटिनाईन | ९. सीके.एमबी | १६. सीबीसी |
| ३. सेरम सोडियम | १०. ट्रॉप-१ | १७. बीसीटीसी |
| ४. सेरम पोटॅशियम | ११. प्रोथ्रोम्बीन टाईम | १८. मलेरिया |
| ५. सेरम क्लोराईड | १२. एबीजी टेस्ट | १९. लेप्टो |
| ६. सेरम आयोनिक कॅल्शियम | १३. प्लुरल फ्लुईड / ॲसिटिक फ्लुईड/सीएसएफ (शुगर, प्रोटीन) | २०. डेंग्यु एनएस१ & आयजीएम |
| ७. टोटल बिलरुबीन | १४. अमायलास | २१. ब्लड ग्रुप व क्रॉसमॅच |

| अ.क्र. | विभागाचे नाव | रुग्णशय्या | | अ.क्र. | विभागाचे नाव | रुग्णशय्या |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | औषधशास्त्र चिकित्सा | ५७ | | १० | शल्यचिकित्सा | ३० |
| २ | मनोविकार चिकित्सा | १० | | ११ | स्त्रीरोग व प्रसूतीशास्त्र | ९० |
| ३ | अग्नीदाह (बर्न्स) | १० | | १२ | अस्थिव्यंग चिकित्सा | ६० |
| ४ | जेरियाट्रीक | ३० | | १३ | कान नाक घसा चिकित्सा | १० |
| ५ | केमोथेरपी | १० | | १४ | नेत्ररोग चिकित्सा | १० |
| ६ | डायलेसिस | ०७ | | १५ | वैद्यकीय अतिदक्षता | १४ |
| ७ | डॉट्स (टी.बी.) | १० | | १६ | शल्यचिकित्सा अतिदक्षता | १६ |
| ८ | पे बेड्स | ३० | | १७ | नवजात अर्भक अतिदक्षता | १० |
| ९ | बालरोग चिकित्सा | ४० | | | एकूण | ४४४ |

## २.७ प्रशासकीय रचना:




## २.६ राष्ट्रीय कार्यक्रम अंमलबजावणी:

महात्मा ज्योतिराव फुले जीवनदायी आरोग्य योजना, प्रधानमंत्री जन आरोग्य योजना, जननी सुरक्षा योजना, जननी शिशु सुरक्षा कार्यक्रम, कुटुंब कल्याण कार्यक्रम, प्रधानमंत्री सुरक्षित मातृत्व अभियान, जागतिक लसटोचणी कार्यक्रम, राष्ट्रीय क्षयरोग निर्मुलन प्रकल्प,

## २.८ शैक्षणिक सुविधाः

महाराष्ट्र वैद्यकीय परिषद (एम.एम.ई.) मान्यता प्राप्त कंटिन्युअस मेडिकल एज्युकेशन (सी.एम.ई.) आणि महाराष्ट्र परिचारिका परिषद (एम.एन.ई.) मान्यता प्राप्त कंटिन्युअंस नर्सिंग एज्युकेशन (सी.एन.ई.) घेण्याचे हे रुग्णालय आहे. तसेच पदव्युत्तर पदविका सीपीएस कोर्सेस साठी हे रुग्णालय मान्यताप्राप्त आहे. ह्या रुग्णालयात पदव्युत्तर पदवी डी.एन.बी. अभ्यासक्रम सुरू करण्यासाठी आवश्यक ती कार्यवाही सुरू आहे.
ह्या रुग्णालयात डी.एन.बी. अभ्यासक्रम सुरू करण्यास नॅशनल बोर्ड ऑफ एक्झामिनेशन यांनी मंजुरी प्राप्त झालेली आहे. अनुषंगाने पुढील कार्यवाही सुरू आहे.

वैद्यकीय चिकित्साशास्त्र विभागामध्ये (पोस्ट एम.बी.बी.एस. २ विद्यार्थी)

ई.एन.टी. विभागामध्ये (पोस्ट एम.बी.बी.एस. १ व पोस्ट डिप्लोमा १ विद्यार्थी)

स्त्रीरोग व प्रसूती विभागामध्ये (पोस्ट एम.बी.बी.एस.२ व पोस्ट डिप्लोमा २ विद्यार्थी)

बालरोग चिकित्सा विभागामध्ये (पोस्ट एम.बी.बी.एस.२ व पोस्ट डिप्लोमा २ विद्यार्थी)

## २.९ अतिविशेष शाखांच्या उपचार उपलब्ध करण्याचे नियोजनः

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या चार वैद्यकीय महाविद्यालयांशी संलग्न असलेल्या प्रमुख रुग्णालयांमध्ये अतिविशेष शाखांची उपचार सुविधा उपलब्ध आहे. उपनगरांतील रुग्णांना त्यांच्या राहत्या ठिकाणापासून नजीक सुपर स्पेश्यालिटी उपचार व्यवस्था उपलब्ध व्हावी यासाठी कांदिवली (पश्चिम) येथील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर महापालिका सर्वसाधारण रुग्णालयाच्या आवारात सुपर स्पेश्यालिटी रुग्णालयासाठी आरक्षित असलेल्या सी.टी.एस. क्र.२२३,२२४ व २२८ विलेज पोयसर ह्या रिकाम्या भूभागावर एकूण ३२५ रुग्णशय्या क्षमतेचे सुपरस्पेश्यालिटी रुग्णालय सुरू करण्यात येणार आहे. येथे अतिविशेष उपचारांच्या २२६ सर्वसाधारण खाटा, ९९ अतिदक्षता विभागाच्या खाटा, ७ मोड्युलर ऑपरेशन थिएटर्स व २ नियमित ओ.टी. उपलब्ध होणार आहेत.

सदर सुपरस्पेश्यालिटी रुग्णालय प्रकल्पामध्ये २ एमआरआय, २ सिटीस्कॅन, २ एक्स-रे, १ पेट स्कॅन, १ लिनिअर ॲक्सिलरेटर, १ ब्रॅकायथेरपी युनिट, हिस्टोपॅथोलॉजी लॅब,

मायक्रोबायोलॉजी लॅब, बायोकेमिस्ट्री लॅब, हेमेटोलॉजी लॅब, ब्लड बँक, सी.एस.एस.डी. उभारण्यात येणार आहे.

सदर प्रकल्पामध्ये दोन बेसमेंट + तळमजला + १० मजली मुख्य रुग्णालय इमारत व कनेक्टिंग ब्रिज, २२ मजली रेसिडेंशियल बिल्डिंग (२२४ ब्लॉक्स), पोस्ट मॉर्टेम बिल्डिंग (तळ + एक मजला, धर्मशाळा, सर्विस यार्ड, वेस्ट मॅनेजमेंट शेड, एसटीपी/ईटीपी यांचा समावेश आहे. या प्रकल्पाचे सल्लागार वास्तुरचनाकार मे. जी.डी.सांभारे ऍंड कंपनी आहेत.

सदर प्रकल्पाच्या बांधकामासाठी महानगरपालिकेच्या विहित पध्दतीने निविदा प्रक्रिया राबविण्यात आलेली असून त्यात यशस्वी ठरलेल्या मलानी-अविघ्ना-एक्सेंट-जेव्ही ह्या कंत्राटदारांना कार्यादेश दिला आहे. त्यांनी प्रकल्प उभारणीचे काम दिनांक ०३ मे, २०२२ रोजी सुरू केले आहे. प्रकल्प पूर्ण होण्याचा कालावधी ३६ महिन्यांचा निर्धारीत केला आहे.

..........